ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ९ मार्च, १९६० | अंक १०

## विविध माहिती

**मोठ्या नाट्यगृहांची जरूर नाहीं**—मध्यवर्ती सरकारच्या शास्त्रीय संशोधन सांस्कृतिक खात्यातर्फे नाट्यगृहांची बांधणी कशी असावी ह्यासंबंधीं चर्चा करण्यासाठी एक परिसंवाद भरविण्यांत आला होता. परिसंवादांत असें मत व्यक्त करण्यांत आलें कीं, भारतांत मोठ्या नाट्यगृहांची जरूरी नाहीं. मध्यम आकाराचीं नाट्यगृहें अधिक सोईस्कर होतील.

**कुटुंबनियोजन केंद्रें**—सुरत म्युनिसिपालिटीनें कुटुंबनियोजनाबाबत सल्ला देणारीं केंद्रें आणखी एक वर्षभर चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. बुद्धिमान् वर्ग कुटुंबनियोजन करतो व गलिच्छ वस्त्यांतून राहणारे बेसुमार प्रजोत्पादन करतात; त्यामुळें देश कर्तबगार मुलांना मुकतो अशी टीका कांहीं सभासदांनीं केली होती.

**म्हैसूर सरकारला कर्ज**—हातीं येथील सोन्याच्या खाणीचा विकास करण्यासाठी मध्यवर्ती सरकार म्हैसूरच्या राज्य-सरकारला १९.५ लाख रुपयांचें कर्ज पुढील आर्थिक वर्षांत देणार आहे. दररोज ३५० टन सुवर्णमिश्रित माती सध्यां खणण्यांत येते. ती रोज १,००० टन खणतां यावी असा सरकारचा उद्देश आहे.

**रशिआ-अमेरिका व्यापार**—रशिआचे अमेरिकेंतील वकील मि. मेन्शिकॉव्ह ह्यांनीं अमेरिकेच्या व्यापारखात्याकडे उभयता देशांतील व्यापार वाढविण्याच्या कामीं येणाऱ्या अडचणी कळविल्या आहेत. अमेरिकन कंपन्या जो माल रशिआकडून घेतात तो रशिअन बोटींवरून पाठवितां येत नाहीं व कांहीं प्रकारचा अमेरिकन माल रशिआला निर्यात करण्यास परवानगी देण्यांत येत नाहीं, अशा त्यांच्या मुख्य तक्रारी आहेत.

**पाकिस्तानच्या राजधानीचें नांव**—रावळपिंडीजवळ बांधण्यांत येत असलेल्या पाकिस्तानच्या नव्या राजधानीचें नांव इस्लामाबाद असें ठरविण्यांत आलें आहे. नव्या राजधानीची आंखणी करण्याचें काम एका स्वतंत्र कमिशनकडे देण्यांत आलें आहे. नवी राजधानी रावळपिंडीजवळच्या एका पठारावर बसविण्यांत येत आहे.

**सर्वोदय कार्यकर्त्यांचा अभ्यास**—अखिल भारतीय सर्वोदय संघानें ३३ जणांचें एक मंडळ इस्राइलमध्यें पाठविण्याचें ठरविलें आहे. इस्राइलमधील सहकारी संस्था, शेती, गोठवाडा व कोंबडी पाळण्याचा धंदा ह्यांचा सहा महिने अभ्यास करण्यासाठी मंडळ जात आहे. खर्च इस्राइल सरकार सोसणार आहे.

**मध्यप्रदेशाचा वीजपुरवठा**—ओरिसामधील हिराकूद धरणावर उत्पन्न होणाऱ्या विजेंतून ९,००० किलोवॅट वीज मध्यप्रदेशाला पुरविण्यांत यावी अशी विनंती मध्यप्रदेश सरकारतर्फे ओरिसा सरकारला करण्यांत आली होती. प्रथम ५,००० किलोवॅट वीज पुरवतां येईल असें वाटलें होतें. पण नंतर तीहि पुरवितां येणार नाहीं, असें दिसून आलें. ओरिसाला स्वतःच्या औद्योगिक वाढीसाठी वाढत्या प्रमाणावर विजेची जरूर आहे.

**वैदिक संशोधन-संस्था**—राजकोटपासून २६ मैलांवर असलेल्या टंकारा ह्या गांवीं एक वैदिक संशोधन संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या संस्थेसाठी १० लाख रुपये खर्च येणार असून ती एक आर्यसमाजी पुढारी काढणार आहे. टंकारा ह्या गांवीं १३५ वर्षांपूर्वी दयानंद सरस्वती ह्यांचा जन्म झाला होता.

**दिल्ली प्रदर्शनांतील अणुभट्टी**—दिल्ली येथील जागतिक शेतकी प्रदर्शनांत अमेरिकेनें एक अणुभट्टी उभारली होती. प्रदर्शन संपल्यानंतर ही अणुभट्टी बहुधा भारताच्या अणुशक्तीमंडळाला देणगी म्हणून देण्यांत येईल. ही भट्टी चालू ठेवण्याच्या कामीं हिंदी शास्त्रज्ञांनीं अमेरिकन शास्त्रज्ञांबरोबर सहकार्य केलें होतें.

**माथेरान स्टेशनचा गौरव**—माथेरान रेल्वे स्टेशनला स्वच्छतेबद्दलचें शील्ड देण्यांत आलें आहे. स्टेशनवरील स्वच्छता राखण्याच्या कामीं स्टेशनमास्तर श्री. कांबळे ह्यांनीं खूप परिश्रम घेतले होते. त्यांनाहि त्यांच्या कामगिरीचा गौरव म्हणून एक पदक देण्यांत आलें आहे. असें पदक मिळविण्याची त्यांची ही चवथी खेप आहे.

**पं. नेहरूंची सुरतगडला भेट**—राजस्थानांतील सुरतगड ह्या यांत्रिक शेतीसंघटनेला पंतप्रधान श्री. नेहरू ह्यांनीं भेट दिली. रशिआच्या मदतीनें स्थापन करण्यांत आलेल्या ह्या शेतीचा विस्तार ३०,००० एकर आहे. अशाच प्रकारचीं आणखी कांहीं मोठीं यांत्रिक शेतीचीं केंद्रें उभारण्याचा सरकारचा विचार आहे.

**प्राचीन वस्तूंचें पदार्थसंग्रहालय**—मध्यवर्ती सरकारचे शास्त्रीय संशोधनखात्याचे मंत्री मि. हुमायून कबीर ह्यांनीं कोनारक येथें प्राचीन वस्तूंच्या संग्रहालयाच्या पायाचा दगड बसविला. कोनारक येथें भारतामधील सुप्रसिद्ध सूर्यमंदिर आहे. ह्या संग्रहालयाच्या स्थापनेसाठी २॥ लाख रु. खर्च येईल. त्यांत मुख्य मंदिरापासून तुटून पडलेले प्राचीन शिल्पकलेचे शिलाखंड ठेवण्यांत येतील.

## परदेशी भांडवलाला भारताचें आवाहन

आंतरराष्ट्रीय आर्थिक-मंडळाचे तिघे प्रतिनिधी सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहेत. मुंबई येथें फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेच्या कमिटीशीं ह्या मंडळानें भारतांत परदेशी भांडवल गुंतविण्यासंबंधी चर्चा केली. फेडरेशनचे अध्यक्ष श्री. मदनमोहन रुइया ह्यांनीं भारताच्या आर्थिक परिस्थितीची व गरजांची कल्पना मंडळाला दिली. ते म्हणाले कीं परदेशी खाजगी मालकीचें भांडवल भारतांत गुंतविणें उभयपक्षांना हितावह ठरणार आहे. त्यामुळें भारताच्या आर्थिक प्रगतीला अधिक जोराची चालना मिळेल. पश्चिम जर्मनी, ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यासारख्या देशांनीं भारतांत भांडवल गुंतविण्याची तयारी दाखविली तर भारत त्याचें स्वागत करील. ह्या विषयाचा विचार करतांना परदेशी भांडवल किती गुंतविलें जातें आणि त्यामुळें भांडवली स्वरूपाचा माल किती मिळतो एवढाच विचार करून चालणार नाहीं. त्याचबरोबर औद्योगिक कौशल्य किती प्रमाणांत आयात करतां येईल ह्याचाहि विचार झाला पाहिजे. गुंतविलेल्या भांडवलावर मिळालेला नफा मायदेशीं पाठविण्याच्या बाबतींत भारतानें सवलती दिलेल्या आहेत. त्याशिवाय दुबार कर बसूं नये म्हणूनहि व्यवस्था करण्यांत आली आहे. विकास पावत असलेल्या अर्थव्यवस्थेंत कांहीं प्रमाणांत ताण उत्पन्न होणें साहजिकच असतें. तेवढा ताण सोडला तर भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. आर्थिक विकासाची एक प्रकारची गति भारतानें निर्माण केली आहे आणि ती टिकविली आहे. १९५७ व १९५८ सालीं ही गति कमी झाली होती, पण आतां ती पुन्हां वाढली आहे.

---

**शस्त्रवैद्यकाचीं हत्यारें**—मद्रास राज्यांत गिंडी येथें शस्त्रवैद्यांना लागणारीं निरनिराळ्या प्रकारचीं हत्यारें व उपकरणें तयार करण्याचा कारखाना रशिआच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. कारखान्यासंबंधीं रशिअन तज्ज्ञांशीं सध्यां बोलणीं चालू आहेत. मध्यवर्ती सरकारच्या पुरस्कारानें काढण्यांत येणाऱ्या कारखान्यासाठी ८ कोटी रु. लागतील.

**बुद्धविहाराचा शोध**—गुजरातमधील साबरकांठा जिल्ह्यांत बडोदा विद्यापीठानें कांहीं उत्खननाचें कार्य चालविलें होतें. काम चालू असतां सुमारें १,५०० वर्षांपूर्वीच्या एका बुद्धविहाराचे अवशेष सांपडले आहेत. विहार क्षत्रप राजांच्या कारकीर्दीत बांधला गेला असावा असा अंदाज आहे. बुद्धाचा एक अर्ध-पुतळाहि सांपडला आहे.

**कापड कामगारांना बोनस**—अहमदाबादमधील ६२ गिरण्यांपैकीं फक्त ६ गिरण्याच १९५८ चा बोनस देण्याबद्दलचा इंडस्ट्रिअल कोर्टाचा निवाडा अंमलांत आणणार आहेत. बाकीच्या गिरण्या निकालाविरुद्ध सुप्रीम कोर्टांत अपील करणार आहेत. बोनससंबंधीं मालकांच्या व मजुरांच्या संघटनेनें मान्य केलेला ५ वर्षांचा करार १९५७ सालीं रद्द झाला आहे.

**९ वर्षांनंतर जाग आली**—१९५१ सालीं मॉस्कोमधील एक महिला कांहीं धक्क्यानें बेशुद्ध झाली. रशिअन डॉक्टरांनीं तिला शुद्धीवर आणण्यासाठी एकसारखे प्रयत्न चालविले होते. अगदीं आधुनिक पद्धतीचे उपचार करून रशिअन डॉक्टरांनीं प्रयत्नांची शिकस्त केली. अखेर ९ वर्षांनंतर ती हळूहळू शुद्धीवर आली. आतां ती पूर्णपणें बरी झाली आहे.

## साठ हजार सरकारी नोकरांस हिंदीचें शिक्षण

मध्यवर्ती सरकारनें देशांत ५६ ठिकाणीं सुरू केलेल्या हिंदी शिक्षणवर्गांत भारत सरकारच्या ६०,००० हून अधिक नोकरांनीं आतांपर्यंत शिक्षण घेतलें आहे.

---

## १८ वर्षांत १८ मुलें

लंडन येथें मिसेस स्टोन ह्या ३६ वर्षांच्या स्त्रीला गेल्या आठवड्यांत १८ वें मूल झालें. तिचा विवाह १८ वर्षांपूर्वींच झालेला आहे. म्हणजे, १८ वर्षांत ती १८ वेळां प्रसूत झाली. ह्या १८ मुलांपैकीं १० मुलगे व ५ मुली अशीं १५ अपत्यें हयात आहेत.

---

## पाकिस्तानांत दशमान पद्धतीस प्रारंभ

१ जानेवारी, १९६१ पासून पाकिस्तानांत नाण्यांची आणि वजन-मापांची दशमानपद्धति सुरू करण्यांत येईल.

---

## एक ऑक्टोबर, १९६० पासून तांबे-निकलचीं दोन व अर्ध्या आण्याचीं नाणीं रद्द

भारत सरकारनें १ ऑक्टोबर, १९६० पासून तांबे-निकलचीं दोन आण्याचीं व अर्ध्या आण्याचीं नाणीं (पांढऱ्या रंगाचीं) कायदेशीर चलन म्हणून रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि हीं नाणीं ३१ मार्च १९६१ पर्यंत रिझर्व्ह बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, सरकारी व्यवहार करणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या सर्व एजन्सी बँकांत आणि सरकारी ट्रेझरींत व सब् ट्रेझरींत तीं बदलून घेण्यासाठीं अथवा पैसे भरण्यासाठी स्वीकारण्यांत येतील. त्याचप्रमाणें रेल्वे, टपाल व तार खात्याच्या कचेऱ्यांत पैसे भरण्यासाठी या नाण्यांचा या तारखेपर्यंत स्वीकार करण्यांत येईल या तारखेनंतरहि पुढें जाहीर करीपर्यंत हीं नाणीं मुंबई कलकत्ता, मद्रास, कानपूर, नवी दिल्ली, बंगलूर व मद्रास येथील रिझर्व्ह बँकेच्या शिक्षू डिपार्टमेंटच्या कचेऱ्यांत स्वीकारण्यांत येतील.

---

## दि भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहारांत निव्वळ नफा रु. ४१,४४७-९३ झाल्याचें दिसून येईल. या रकमेची वांटणी खालील प्रमाणें करावी अशी संचालकांची शिफारस आहे.

| | | |
|---|---|---|
| रिझर्व्ह फंडांत जमा करण्यासाठी (बँकिंग कंपनीचे ॲक्ट १९४९ चें कलम १७ अन्वयें) | रु. | ८,५००-०० |
| कर्जे रोख्यावरील घसारा फंडासाठी | रु. | ३,०००-०० |
| ६% क्यु. प्रे. शेअर्सवर डिव्हिडंड देण्यासाठी (करपात्र) | रु. | १,६३४-०० |
| ऑर्डिनरी शेअर्सवर ३% डिव्हिडंड देण्यासाठी (करपात्र) | रु. | ११,१५७-०० |
| इन्कमटॅक्सचे तरतुदीसाठी | रु. | १७,०००-०० |
| पुढील वर्षाचे नफ्यांत मिळविण्यासाठी | रु. | १५६-९३ |
| | रु. | ४१,४४७-९३ |

---

## रूरकेला कारखान्याचे ३०,००० कामगार बेकार होणार

रूरकेला पोलाद कारखान्याचें काम पुरें झाल्यावर येत्या १२ महिन्यांत तेथील ३०,००० कामगार बेकार बनतील, असें ओरिसाच्या मंत्र्यांनीं सांगितलें.

# अर्थ

बुधवार, ता. ९ मार्च, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची रशिआची योजना

रशिआचे पंतप्रधान मि. ख्रुश्चोव्ह ह्यांनीं आपल्या इंडोनेशिआच्या दौऱ्यांत मॉस्को येथें एक खास आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याचा रशिअन सरकारचा विचार आहे असें जाहीर केलें आहे. विद्यापीठाचें संकल्पित नांव 'युनिव्हर्सिटी ऑफ पीपल्स फ्रेंडशिप' असें आहे. नांवावरून आंतरराष्ट्रीय मैत्री वाढविण्याचा उद्देश स्पष्टच होत आहे. पण संकल्पापेक्षा व नांवापेक्षा कृतीला अधिक महत्त्व आहे. रशिआ आपला संकल्प अंमलांत आणण्याचा उद्योग तावडतोब सुरू करणार असल्याच्या वार्ता हातीं आल्या आहेत. संकल्पित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांत प्रारंभीं सुमारे ५०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येणार आहे. हळूहळू हा आंकडा ४,००० पर्यंत वाढविण्याचा रशिआचा उद्देश आहे. विद्यापीठांतील विद्यार्थी मुख्यत: आशिआ, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्या भूभागांतून निवडण्यांत येणार आहेत. जगांत आज जो भाग आर्थिकदृष्ट्या अविकसित आहे त्यांतील बहुतेक प्रदेश वरील खंडांत समाविष्ट झालेला आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे रशिआची विद्यापीठाची योजना किती दूरवर परिणाम करणारी ठरूं शकेल तें सहज समजतें. निवडलेल्या विद्यार्थ्यांचा जाण्यायेण्याचा प्रवासखर्च, त्यांचा राहण्याजेवणाचा खर्च, शिक्षणाचा व आरोग्यविषयक खर्च रशिआच सोसणार आहे. त्याशिवाय त्यांना मासिक भत्ताहि देण्यांत येणार आहे. ही योजना अंमलांत आली तर रशिया व अपुरा विकास झालेले देश ह्यांच्या दरम्यान सलोख्याचे व जवळचे संबंध निर्माण होण्यास फार मदत होणार आहे. तिचे राजकीय परिणाम लक्षांत न घेतले तरी शिक्षण व तांत्रिक विज्ञान ह्या क्षेत्रांत रशिआ अविकसित देशांत आपला पाय रोवेल ह्यांत शंका नाहीं.

---

## काश्मीरच्या प्रवासासाठीं अधिक सोयी

काश्मीरच्या सरकारच्या प्रवासी खात्याचे डायरेक्टर श्री. मदन ह्यांनीं प्रवास घडविणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींना एकत्र बोलावून काश्मीर सरकार प्रवाशांसाठीं करणार असणाऱ्या सोयी-सवलतींची माहिती दिली. ते म्हणाले कीं मध्यपूर्वेकडील देशांकडून काश्मीरला येण्यासाठीं ब्रिटिश ओव्हरसीज् कंपनी खास विमानें सोडणार आहे. त्यामुळें ह्या वर्षीं काश्मीरला येणाऱ्या परदेशी प्रवाशांच्या संख्येंत बरीच वाढ होण्याचा संभव आहे. काश्मीर सरकार चालू वर्षाच्या सर्व हंगामांत प्रवाशांना पूर्वीपेक्षां अधिक सोयी उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळें प्रवाशांना काश्मीरच्या प्रवासाचा आनंद मनमुराद लुटतां येईल. ह्या वर्षीं काश्मीरच्या सरकारनें प्रवाशांना राहण्यासाठीं दोन नवीं केंद्रें उघडलीं आहेत. १९५९ सालीं काश्मीरला आलेल्या प्रवाशांनीं नवा उच्चांक स्थापन केला आहे. पूर्वीं कधींहि नाहीं इतके म्हणजे सुमारें ७०,४०० प्रवासी काश्मीरचा आस्वाद घेऊन गेले. त्यापैकी १०,६३९ प्रवासी परदेशांतून आलेले होते. प्रवाशांची सोय करण्याच्या योजनांना अग्रहक्क देण्याचें काश्मीरच्या सरकारचें धोरण आहे. इंडियन एअर लाइन्स कॉर्पोरेशन दिल्ली ते काश्मीर हा प्रवास करणारीं विमानें आठवड्यांतून चार वेळां सोडण्याचा विचार करीत आहे. ही वाहतूक एप्रिल महिन्यापासून सुरू करण्यांत येण्याचा संभव आहे. त्याशिवाय दिल्ली ते जम्मू, जम्मू ते श्रीनगर, आणि पठाणकोट ते श्रीनगर अशी प्रवासी वाहतूकहि हंगामांत सुरू होण्याची शक्यता आहे. प्रवाशांची राहण्याची व जेवणाखाणाची सोय करणाऱ्या केंद्रांवर काश्मीरचें सरकार चालू वर्षीं सुमारें ५० लाख रुपये खर्च करणार आहे.

---

## चीनच्या प्रगतीबद्दल धोक्याचा इषारा

अमेरिकेकडून परदेशांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीची व्यवस्था पाहणारे मि. जेम्स रिडलबर्जर ह्यांनीं चीनच्या प्रगतीबद्दल इषारा दिला आहे. इंटरनॅशनल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशन ह्या संघटनेचे ते डायरेक्टर आहेत. अमेरिकन प्रतिनिधीगृहाच्या परदेशीय घडामोडी समितीपुढें साक्ष देतांना ते म्हणाले कीं चीनमधील घडामोडींवरून असें दिसत आहे कीं येत्या १० वर्षांत त्याची आर्थिक प्रगति चांगलें बळ धरील. चीनचे आर्थिक व औद्योगिक सामर्थ्य ह्या काळांत दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभीं असलेल्या रशियाच्या सामर्थ्याइतके होईल असा अंदाज आहे. कम्युनिस्ट चीनची जर अशीच प्रगति होत राहिली तर पुढील दहा वर्षांत लष्करी सामर्थ्याचा केंद्रबिंदु अतिपूर्वेकडे व आग्नेय आशिआंत सरकेल, आणि त्यामुळें केवळ ह्याच भागांत नव्हे तर जगाच्या इतर भागांतहि महत्त्वाचे बदल घडून येतील. कम्युनिस्ट चीन प्राप्त झालेल्या नव्या शक्तीमुळें कसा वागेल हें अर्थातच सांगतां येत नाहीं. परंतु पाश्चिमात्य जगानें बेसावध असून चालणार नाहीं इतकें मात्र निश्चित आहे. दुसऱ्या महायुद्धांत अमेरिकेवर पर्ल हार्बर येथें जपाननें अचानक हल्ला केला. तसाच हल्ला चीन करील असा अर्थ नाहीं. पण, चीनकडून राजकीय, आर्थिक व सामाजिक आघाडीवर एकदम चढाईचें धोरण स्वीकारलें जाण्याची शक्यता विसरून चालणार नाहीं. अशी चढाई करण्यांत आली तर अफगाणिस्थानपासून कोरियापर्यंतच्या आशिआंतील स्वतंत्र देशांवर फार मोठा परिणाम होईल. म्हणून आशियांतील स्वतंत्र देशांना औद्योगिक दृष्ट्या समर्थ करण्यासाठीं अधिक आर्थिक मदत देण्यांत आली पाहिजे.

---

**कमी खोलीवर तेल सांपडलें**—खंबायत येथें तेलाची पांचवी विहीर यशस्वीपणें खोदण्यांत आली आहे. ह्या विहिरीचें खोदकाम चालू असतां अवघ्या १,५५० मीटरवर तेल आढळून आलें. आणखी तीन विहिरी खोदण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे.

## सहकारी साखर कारखान्यांचा विस्तार

पतिआळा येथें अखिल भारतीय सहकारी साखर कारखान्यांच्या प्रतिनिधींचा एक मेळावा भरविण्यांत आला होता. सहकारी साखर कारखान्यांनीं केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी भरविण्यांत आलेला हा तिसरा मेळावा आहे. नवीन सहकारी साखर कारखान्यांना लागणारा पैसा कसा उभा करावा आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत साखर कारखान्यांना परवाने देण्याच्या बाबतींत कोणतें धोरण स्वीकारावें, ह्याहि बाबतींत पतिआळा येथें विचार करण्यांत आला. सहकारी साखर कारखान्यांची जी मध्यवर्ती राष्ट्रीय संघटना स्थापन करण्यांत येणार आहे तिच्या नियमांचा मसुदा तयार करण्यासंबंधींहि विचार करण्यांत आला. सध्यां चालू असलेल्या सहकारी कारखान्यांच्या कामांत एकसूत्रता आणण्यासाठी व नवे सहकारी कारखाने काढण्याच्या कामांत मदत देण्यासाठी संघटनेची स्थापना करण्यांत येणार आहे. १९५८–५९ च्या हंगामांत देशांतील साखरेच्या एकूण उत्पादनापैकी जवळ जवळ १० टक्के उत्पादन सहकारी साखर कारखान्यांनीं केलें. एकूण १९·३९ लाख टन साखरेपैकी १·७९ लाख टन साखर त्यांनीं निर्माण केली. १९५८–५९ सालीं भारतांत २१ सहकारी साखर कारखाने प्रत्यक्ष उत्पादन करूं लागले होते. १९५४ सालीं त्यांची संख्या अवघी २ होती. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस आणखी १७ कारखाने स्थापन करण्यांत येतील. सर्वांत अधिक सहकारी साखर कारखाने मुंबई राज्यांत आहेत. त्यांची संख्या १६ आहे. त्या खालोखाल पंजाब व आंध्र राज्यांत प्रत्येकी ५ सहकारी कारखाने आहेत.

---

## धर्मोपदेशकहि मोहांतून सुटत नाहींत

आधुनिक तांत्रिक सुधारणेचें माहेरघर जी अमेरिका, तेथील मुलांवर टेलिव्हिजनचा अनिष्ट परिणाम होत असल्याच्या तक्रारी त्या देशांतील जबाबदार नागरिक बरेच दिवस करीत आहेत. मुलें अभ्यास सोडून व व्यायाम करण्याचें सोडून टेलिव्हिजनवरील कार्यक्रम पहाण्यांत तासचेतास घालवितात. टेलिव्हिजनवरील भावनोद्दीपक व गुन्हेगारीचीं दृश्यें पाहून त्यांच्या मनाला विकृत वळण लागतें असा वरील तक्रारींचा आशय आहे. मुलांना सिनेमा अगर टेलिव्हिजन पाहूं न देण्याचा विचार करणें निदान तात्त्विक दृष्ट्या शक्य आहे. पण ही बंदी मोठ्यांच्या बाबतींत शक्यच नाहीं. म्हणूनच इटलीमधील एका मुख्य धर्मोपदेशकानें आपल्याच व्यवसायबंधूंबद्दल केलेली तक्रार चिंताजनक आहे. ह्या धर्मोपदेशकाला असें आढळून आलें आहे कीं टेलिव्हिजनवरील कार्यक्रमांनीं धर्मोपदेशकांच्या मनावरहि जबर पकड बसविली आहे. ही मोहिनी इतकी जबर आहे कीं, धर्मोपदेशक टेलिव्हिजनपायी झोपेची पर्वा तर करीत नाहींतच; पण त्यांच्या धार्मिक कर्तव्यांतहि कसूर करतांना आढळून येतात. टेलिव्हिजनवरील दृश्यांत ज्या न पहाण्यासारख्या गोष्टी असतात त्यांचा परिणाम धर्मोपदेशकांच्या मनावर होत असलाच पाहिजे. असें असतांना दुसऱ्या दिवशीं ते आध्यात्मिक प्रवचनें कशीं करूं शकतात, अशीहि शंका मुख्य धर्मोपदेशकांनीं व्यक्त केली आहे. टेलिव्हिजनवरील सर्वच कार्यक्रम नैतिक अधःपाताला कारणीभूत होणारे असतात असें म्हणतां येणार नाहीं. अखेर हा प्रश्न, काय दाखवावें व तें कोणी, केव्हां, पहावें असा होऊन बसतो.

**सांस्कृतिक अवशेषांना धोका**—इजिप्तमध्यें नाईल नदीवर आस्वान ह्या ठिकाणीं जें मोठें धरण बांधण्यांत येत आहे त्यामुळें इजिप्तच्या प्राचीन संस्कृतीच्या निदर्शक अशा बऱ्याच इमारती पाण्याखाली बुडण्याचा धोका आहे. संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे, हे अवशेष वांचविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. भारतामधील नागार्जुनकोंडा धरणांत असे कांहीं अवशेष बुडणार आहेत.

**तोंडाच्या कॅन्सरचें प्रमाण अधिक** — टाटा मेमोरिअल इस्पितळाचे मुख्य शास्त्रवैद्य डॉ. पेमास्टर ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं भारतांत तोंडाला होणारा कॅन्सर अधिक प्रमाणांत आढळून येतो. इस्पितळांत २० वर्षांत ४०,००० कॅन्सरच्या रोग्यांना उपचार करण्यांत आले. त्यांपैकी निम्म्या रोग्यांना तोंडांतील कॅन्सर झालेला होता.

**म्हैसूर राज्यांत नवे पूल**—म्हैसूर राज्याच्या सार्वजनिक बांधकामखात्यानें तुंगभद्रा व कुमुद्वती नद्यांवर व कांहीं नाल्यांवर पूल बांधून दळणवळण सुलभ करण्याचें ठरविलें आहे. ह्या पुलासाठी सुमारें ७५ लाख रुपये खर्च येणार आहे. होनावर येथें होणाऱ्या तुंगभद्रेवरील पुलामुळें धारवाड व बेल्लारी जिल्हे जोडले जाणार आहेत.

**अमेरिकन तज्ज्ञांची मदत**—खंबायतपासून १५ मैलांवर असलेल्या तारापोर ह्या गांवीं तेलाच्या शोधासाठी नव्या विहिरी खोदण्यांत यावयाच्या आहेत. ह्या कामीं आतांपर्यंत रशिअन व रुमेनिअन एंजिनिअरांची मदत घेण्यांत आली आहे. पण तारापूर येथील विहिरींसाठी अमेरिकन तज्ज्ञांची मदत घेण्यांत येणार आहे.

---

# Notice

**Bhor State Bank Limited, Bhor.**

Notice is hereby given that the 15th Ordinary General Meeting of the Share-holders of Bhor State Bank, Ltd., will be held at the registered office of the Bank, at Rajawada Chowk, Bhor (Dist. Poona) at 1 p. m. (S. T.) on Wednesday the 30th March 1960 to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended on 31st December 1959.

(2) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(3) To oppoint Auditors for the current year and to fix their remuneration.

(4) To transact such other business as may be allowed by Chairman.

By Order of the Board

Poona, 28th Feb. 1960. B. A. Rajeshirke, Accountant.

---

N. B.—(i) The share transfer books of the Bank will be closed from 23-3-60 to 11-4-60 (both days inclusive).

(ii) A member entitled to attend and vote is entitled to appoint proxy to attend and vote instead of himself and a proxy need not be a member of the company.

## मनोवैज्ञानिक क्रांति

### औद्योगिक संबंधांचा मानसशास्त्रीय विचार

( श्री. वा. काळे ह्यांचें पुणें आकाशवाणीवरील भाषण )

आपला देश हा शेतीप्रधान देश आहे; शेंकडा सत्तर लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. फक्त दहा टक्के लोकांचा चरितार्थ कारखानदारीवर चालतो. मोठमोठे कारखाने निघाले आहेत आणि निघत आहेत; पण औद्योगीकरण अजून रुजलेलें नाहीं. मोठमोठी यंत्रसामुग्री बाहेरून आणून, बहुतेक कारखाने उभारले जात आहेत; औद्योगिक क्रांति हळुहळु होत गेलेली नसून, उद्योगधंदे लवकरांत लवकर वाढावे ह्यासाठी कारखानेच्या कारखाने बाहेरून आणून इथं रोवले जात आहेत. त्या कारणानें, औद्योगिक संबंधांची उत्क्रांति व्हायला सवडच मिळालेली नाहीं. मालकवर्ग आणि कामगार ह्या दोघांचीहि मनोवृत्ति, मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीला अनुरूप, अशी बनलेली नाहीं. औद्योगीकरण म्हणजे केवळ यंत्रांची उभारणी नव्हे; मानवी आशा-अपेक्षांचाहि विचार व्हायला हवा, पण ही गोष्ट अजून आपल्याला नवीन आहे. कायदे मात्र पाश्चात्त्य देशांतील परिस्थिति इथं निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. कुठलेंहि वृत्तपत्र उघडलें, तर त्यांत औद्योगिक तंटे, संघर्ष, निवाडे आणि अपिलें ह्यांच्या बातम्या वाचायला मिळाल्या नाहींत, असें बहुधा घडत नाहीं. मालक आणि कामगार ह्या दोघांनाहि औद्योगिक बाजू पुरेशी माहीत नसते, हेंच खरें. ह्या शास्त्रांत एवढी मोठी क्रांति झालेली आहे, कीं तिच्याकडे दुर्लक्ष करणें घातुकच ठरेल. औद्योगिक प्रगतीला त्याखेरीज अर्थच उरणार नाहीं; सामाजिक सुखसमृद्धीचें उद्दिष्ट गांठतांच येणार नाहीं.

मोठ्या कारखान्यांत एकत्र येऊन यंत्रांवर काम करण्याची, औद्योगिक क्रांतीनंतरची पद्धति आपल्या इकडे नवीन असली, तरी पाश्चात्त्य देशांत ती अठराव्या शतकांतच सुरू झाली. स्वार्थ आणि आधाशीपणा ह्याला तिथला मालकवर्ग बळी पडला. मानवतेला कुणीच विचारीना आणि औद्योगिक क्रांतीमुळें कामगारांचेवर मरेमरेतों काम करूनहि उपासमारीचा प्रसंग आला. औद्योगिक उत्पादनामुळें माणुसकीचा खून पडूं लागला, तर समाजधारणेला त्याचा काय उपयोग ? असा विचार पुढें सुरू झाला.

परंपरागत अर्थशास्त्र असें मानीत आलें होतें कीं सगळे कामगार सारखेच दगड; ठराविक पद्धतीनें वागणारे; ठराविक उद्देशानें जाणारे; त्यांच्या कामाच्या उठावांत फरक पडेल तेवढाच त्यांच्यांत फरक आहे असें समजायचें. गिरणींतले सगळे भाग जसे सारखे, तशींच ती चालविणारी माणसेंहि सारखींच. त्यांच्यांत वैयक्तिक फरक जणू कांहीं नाहींच. औद्योगिक संबंधांच्या शास्त्राची ही झाली प्राथमिक अवस्था. ह्या पुढची पायरी म्हणजे समाज एखाद्या विकसित जीवासारखा. प्राण्यांतील वेगवेगळीं इंद्रियं जशीं क्रिया करतात, तशाच स्वरूपाच्या क्रिया कारखान्यांतील कामगार सहकार्यानें करीत असतात; त्यांचा एकमेकांशीं अदृश्य पण जिव्हाळ्याचा संबंध असतो. यंत्रांच्या हालचालींप्रमाणें माणसांच्या हालचाली निर्विकार असूंच शकत नाहींत. मनोवैज्ञानिक क्रांतीचा आत्ताचा टप्पा ह्याहि पुढें गेलेला आहे. कारखान्यांतील कामाची तुलना एखाद्या यंत्राशीं किंवा जीवाच्या इंद्रियाशीं करणें चुकीचें आहे. मानवांची प्रेरकशक्ति विचारांत घ्यायलाच हवी, आणि ही प्रेरणा निःस्वार्थी, राष्ट्रीय हिताची, आध्यात्मिक सुद्धां असूं शकते ! मनुष्यप्राण्याचे हितसंबंध, संवेदना, भावना, विकार, ह्या सगळ्यांचा एकमेकांवर परिणाम होऊन त्यांतून कृति निर्माण होत असते.

औद्योगिक संबंधांचें मनोवैज्ञानिक शास्त्र हें अगदीं नवीन शास्त्र आहे, आणि तें आपल्या इकडे कारखानदारींत पुढें गेलेल्या राष्ट्रांतून आयात झालेलें आहे; इथल्या परिस्थितींत, इथल्या हवामानांत, तें वाढलेलें नाहीं. पिढ्यान्‌पिढ्या यंत्रांशीं काम करणाऱ्या कामगारांची प्रेरणा आणि प्रथमच यंत्र पाहणाऱ्या अर्धपोटी खेडुताची प्रेरणा ह्यांत फरक पडणार, हें उघड आहे. तरीसुद्धां, पाश्चात्त्य देशांतील मनोवैज्ञानिक क्रांतीचा आपण अभ्यास करून, इथल्या परिस्थितीला जुळेल असें तें शास्त्र व्यावहारिक बनवलें पाहिजे. औद्योगिक संबंध ह्यांत सगळ्या व्यवसायांचा समावेश केलेला आहे; मग तो कारखाना असो, मळा असो, नाहींतर एखाद्या फर्मची कचेरी असो. त्याचप्रमाणें, कामगार हा शब्दहि व्यापक अर्थाचा आहे; त्यामध्यें संचालक, व्यवस्थापक, खातें प्रमुख आणि सामान्य कामगार ह्या सगळ्यांचा समावेश होतो.

मनुष्य जेव्हां काम करीत असतो, तेव्हां त्याचें फक्त शरीरच काम करीत आहे असें दिसतें; वास्तविक, त्याच्या शरीराबरोबर त्याचें मनहि काम करीत असतें; तें कांहीं स्वस्थ नसतें. शरीर आणि मन ह्या दोघांचा जिव्हाळ्याचा संबंध असतो. व्यवसायाची निवड, योग्य कामगारांची नियुक्ति, दमणूक आणि कंटाळा टाळण्याचे उपाय, काम करायला प्रवृत्त करण्यासाठी प्रलोभन निर्माण करण्याचें तंत्र, तंट्यांचीं कारणें आणि त्यावर उपाय, कामाची सर्वोत्कृष्ट आंखणी, अनावश्यक हालचाली आणि श्रम वांचविण्यासाठी योजना, पुरेसा उजेड आणि हवा ह्यांची सोय, कौटुंबिक स्वास्थ्य, विश्रांति आणि करमणूक, ह्या सगळ्या गोष्टींचा अभ्यास ह्या नव्या शास्त्रामध्यें येतो.

नीट काम केलें नाहीं, तर कामावरून काढून टाकले जाईल ही भीति; त्याचप्रमाणें, जास्त काम केलें तर जास्त वेतन मिळण्याची आशा, ह्या गोष्टी सगळ्यांना कळतात. त्या समजावून सांगाव्या लागत नाहींत. पण, त्यांचा परिणाम फार काळ टिकत नाहीं. उत्पादन जास्तींत जास्त कार्यक्षमतेनें व्हायला हवें असेल, तर ह्यापेक्षा अधिक बारकाईनें चौकशी करून कामगारवर्ग कामचुकारपणा का करतो, ह्याची शारीरिकच नव्हे तर मानसिकहि कारणें शोधून काढायला हवींत आणि त्यावर उपाय योजायला हवेत. उत्पादन पुरेसें न होण्याची कितीतरी कारणं असूं शकतात; त्या सगळ्यांची छाननी करायला हवी.

कामगारांनाच बहुधा दोष दिला जातो, पण व्यवस्थापकांचें कामहि दोषास्पद असूं शकतें; त्यामुळेंहि उत्पादनाची गति मंदावते हें विसरलें जातें. केवळ कामगारांचाच विचार केला जातो; व्यवस्थापकांना धारेवर धरलें जात नाहीं, असा कामगारांचा ग्रह झाला, तर तें औद्योगिक संबंध बिघडवण्यास कारणीभूत होईल. म्हणून, अकार्यक्षम व्यवस्थापकांचे हातीं कारखान्याचें नेतृत्व असतां कामा नये. कच्च्या मालाच्या पुरवठ्याचे अभावीं थांबावें लागतां कामा नये; वेळेचा अपव्यय टाळायला हवा. "आधीं केलें मग सांगितलें" ह्या पद्धतीनेंच कामगारांशीं चालकांनीं वागायला हवें. बैलाला चाबूक मारून आणि त्याला पेंढेचा सदा देऊं करून बैलाचें काम कायमचें सुधारणार नाहीं; कामगारांनाहि बेकारी आणि बोनस ह्यापेक्षा अधिक श्रेष्ठ दर्जाच्या प्रेरक शक्तींनें कार्यप्रवण

करायला हवें. औद्योगिक संघटनेचा विचार करतांना, आपण सर्व कारणांची छाननी करून साकल्यानें विचार करायला हवा; प्रत्येक कारणाचें तुलनात्मक महत्त्व जाणून घ्यायला हवें आणि मगच उपाययोजना करायला हवी.

"औद्योगिक संबंधांचें मनोविज्ञान कितीहि पुढें गेलें, तरी त्याचा सामान्य कामगाराला काय फायदा? कारखानदाराचा नफा वाढवण्याची ती युक्ति आहे, एवढेंच!" अशी शंका पुष्कळ वेळा विचारली जाते. "कामगारावरचा दर ताशी उत्पादनाचा बोजा वाढत गेला, म्हणजे त्याच्याकडून त्याच वेळांत आणखी काम करवून घेतलं जाणार; त्याच्या प्राप्तींत जरी भर पडली, तरी काम कुठें हलकं होतय?" ह्या प्रश्नाचें उत्तर असें आहे, कीं औद्योगिक मनोविज्ञानाचा उद्देश जास्तींत जास्त उत्पादन काढण, एवढाच मर्यादित नाहीं. कामगाराचें काम हलकें व्हावें हाहि उद्देश आहे. कामगारावर कामाचा ताण जास्त पडला, तरी तो कमी त्रास पडावा; मानसिक संघर्षणाची सगळीं कारणें नष्ट व्हावीं, चिडाचिडी आणि काळजी दूर व्हावी, कामगार सुखी व्हावा, असच ह्या शास्त्राचें उद्दिष्ट राहील. कामगाराला गैरवाजवी शीण पडूं नये, हें औद्योगिक मनोविज्ञानाला जपावेंच लागतें. जास्त कामापेक्षा काळजी, अनिश्चितता, इत्यादींमुळेंच मनाला शीण येत असतो. हीं कारणें दूर केलीं आणि मानसिक वातावरण सुधारलें, तर जादा ताणाची तक्रार उरणारच नाहीं. दरमाणशीं, दरताशीं उत्पादनवाढ झाली, म्हणजे कामगाराची प्राप्ति वाढेल, एवढेंच नव्हे तर त्याला विश्रांतीहि जास्त मिळेल, करमणूकहि अधिक उपलब्ध होईल.

यंत्रसामुग्रीचा उपयोग जसजसा वाढत जाईल, यंत्रांत सुधारणा होत जाईल, तसतसा कामगार हा यंत्राचा एक भाग न रहातां यंत्रावर देखरेख करणारा बनला पाहिजे, त्याला सुसंस्कृत माणूस म्हणून डौलानें रहातां आलें पाहिजे आणि नागरिकाचे अधिकार योग्य तऱ्हेनें वापरून समाजाचा एक जबाबदार व उपयुक्त घटक म्हणून मानानें वावरतां आलें पाहिजे. मनोवैज्ञानिक क्रांतीचा उद्देश उत्पादनाचे नग वाढविणें एवढाच नसून, तें उत्पादन घडवून आणणारा माणूस सुखी करणें, हाहि आहे. कारखानदार आणि कामगार, ह्या दोघांनाहि ही जाणीव होऊन त्यांचें परस्पर सहकार्य प्रभावी होण्यावर सर्व कांहीं अवलंबून आहे. म्हणून ह्या शास्त्राच्या ज्ञानाचा प्रसार होण्याची आवश्यकता आहे. 'व्यावसायिक मार्गदर्शन' हा त्याचाच एक भाग आहे आणि त्याला मिळत असलेलें वाढतें महत्त्व ही शुभदायक घटना आहे.

(आकाशवाणी पुणें केंद्र ह्यांच्या अनुमतीनें)

---

**रेल्वेच्या व्यापारी विभागांत दशमान पद्धतीचा अवलंब**

एक एप्रिल १९६० पासून भारतीय रेल्वेच्या व्यापारी विभागांत (कमर्शियल डिपार्टमेण्टस) दशमान पद्धतीच्या वजनामापांचा अवलंब करण्याचा निर्णय रेल्वेबोर्डानें घेतला आहे. ह्या दिवसापासून, तक्ते मैलाऐवजीं किलोमीटरमध्यें राहतील. एक किलोमीटर अंतर म्हणजे सुमारें ०·६२ मैल अंतर भरतें. तसेंच, मालवाहतुकीच्या दरांच्या आकारणीसाठी क्विंटल (१ क्विंटल = सुमारें २ मण २७ शेर) हें परिमाण राहील. या बदलामुळें भाड्यांत व मालवाहतूक दरांत अपरिहार्यपणें कांहीं बदल करावा लागेल; परंतु तो कमींत कमी व्हावा याकडे लक्ष देण्यांत येईल. नवीन भाडीं व दर दर्शविणारीं कोष्टकें १ मार्च, १९६० पासून मिळूं लागतील.


# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

| | |
|---|---|
| श्री. म. त्र्यं. शिंगरे<br>अध्यक्ष | न. भू. ना. पां. थोपटे<br>उपाध्यक्ष |
| रावसाहेब य. द. खोले | श्री. चं. रा. राठी |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंदुके |

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## भारत सरकारचे बक्षीस रोखे

१९६५ चे पंचवार्षिक बिनव्याजी बक्षीस रोखे ( प्राइज-बॉण्डस् ) दर्शनी किंमतीस ( at par ) विकत मिळणार असून दिनांक १ एप्रिल १९६५ रोजीं किंवा नंतर त्यांची दर्शनी किंमतीसच परतफेड होईल. दिनांक १ एप्रिल १९६० पासून पुढें जाहीर करीपर्यंत प्रत्येकीं रु. ५ आणि रु. १०० चे विकत मिळतील.

### विक्री

हे प्राइज-बॉण्डस् बेअरर-बॉण्डसूच्या स्वरूपांत असून खालील ठिकाणीं विकले जातील.

( १ ) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआच्या मुंबई, कलकत्ता, नवी दिल्ली, मद्रास, बंगलोर व नागपूर येथील कचेऱ्या.

( २ ) सरकारी ट्रेझरीचें काम करणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडिआ, स्टेट बँक ऑफ हैदराबाद् आणि स्टेट बँक ऑफ म्हैसोरच्या शाखा.

( ३ ) वर क्रमांक १ मध्यें उल्लेख केलेल्या ठिकाणांखेरीज भारतांतील सर्व ट्रेझरीज व सबट्रेझरीज किंवा वरील क्रमांक २मध्यें दिलेल्या बँकांच्या जेथें जेथें शाखा असतील त्या गांवीं. शिवाय,

( ४ ) सर्व हेड पोस्ट ऑफिसेस आणि खात्याचीं सब्‌पोस्ट ऑफिसेस.

सर्व वर्गण्या रोखीनेंच स्वीकारण्यांत येतील आणि त्यांसाठी लेखी अर्ज करण्याची आवश्यकता नाहीं.

### बक्षिसें

हे बॉण्डस् रु. १०० व रु. ५ किंमतीचे असतील; यावर व्याज मिळणार नाहीं. मात्र दरसाल तिमाहीस दिनांक १ जून, १ सप्टेंबर, १ डिसेंबर व १ मार्च रोजीं, बक्षिसांचे लॉटस काढण्यांत येतील. पहिला लॉट १ सप्टेंबर १९६० व शेवटचा १ मार्च १९६५ रोजीं काढण्यांत येईल. भारत सरकारच्या देखरेखीखालीं प्रत्येक गटाचे स्वतंत्र लॉट्स काढण्यांत येतील. प्रत्येक तिमाहीस विजयी बाँडसूच्या उमेदवारांना देण्यांत यावयाची बक्षिसांची संख्या रु. शंभर गटाच्या बाँडसूच्या बाबतींत चाळीस असून सर्व मिळून रु. ९२,००० किंमतीची व रु. पांच गटाच्या बाँडसूच्या बाबतींत ही संख्या दोनशेअठ्ठाहत्तर असून सर्व मिळून रु. ४६,००० अशी राहील. शंभर रुपयांच्या गटाची एकंदर किंमत रु. एक कोटी ( प्रत्येकी रु. १०० चे एक लक्ष बाँडस् ) व रु. पांच गटाच्या बाँड्सची एकंदर रक्कम रु. पन्नास लक्ष ( प्रत्येकी रु. ५ चे दहा लक्ष बाँडस् ) राहील. प्रत्येक बाँड ज्या महिन्यांत विकला जाईल त्या महिन्यानंतर दोन कॅलेंडर महिने पुरे झाल्यावर काढण्यांत येणाऱ्या कोणत्याहि लॉटमध्यें भाग घेण्यास पात्र धरला जाईल. ज्या सिरीझमधून बाँडस् विकले जातील ते सर्व लॉटमध्यें भाग घेण्यास पात्र ठरतील. मात्र विकले न गेलेल्या किंवा लॉट काढण्यापूर्वीच्या अगोदरच्या दोन कॅलेंडर महिन्यांतच विकलेल्या बाँडसूवर बक्षिसें देण्यांत येणार नाहींत.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

### बक्षिसांची संख्या व किंमत

#### रुपये शंभराच्या बॉण्डसूची प्रत्येक सिरीझ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बक्षीस | रुपये २५००० | रुपये २५००० |
| २ | बक्षिसें प्रत्येकी | „ १०००० | „ २०००० |
| ५ | „ „ | „ ५००० | „ २५००० |
| १२ | „ „ | „ १००० | „ १२००० |
| २० | „ „ | „ ५०० | „ १०००० |

प्रत्येक सिरीझच्या एक लक्ष बॉण्डसूच्या रकमेवर दर ——— तिमाहीस देण्यांत यावयाची बक्षिसांची एकूण रक्कम ९२,०००

#### रुपये ५ च्या बॉण्डसूची प्रत्येक सिरीझ

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बक्षीस | रुपये ७५०० | रुपये ७५०० |
| २ | बक्षिसें प्रत्येकी | „ २५०० | „ ५००० |
| १० | „ „ | „ १००० | „ १०००० |
| २० | „ „ | „ ५०० | „ १०००० |
| २५ | „ „ | „ १०० | „ २५०० |
| २२० | „ „ | „ ५० | „ ११००० |

प्रत्येक सिरीझच्या दहा लक्ष बॉण्डसच्या रकमेवर दर ——— तिमाहीस देण्यांत यावयाची बक्षिसांची एकूण रक्कम ४६,०००

सर्व बक्षिसें रोखीने देण्यांत येतील. यावर इंडियन इन्‌कम टॅक्स ॲक्ट १९२२ प्रमाणें प्राप्तिकर द्यावा लागणार नाहीं.

### बक्षिसें देण्याची पद्धत

ज्या उमेदवाराच्या बाँडला बक्षीस मिळालें असेल त्या उमेदवारानें सदर बाँड सादर करून आपल्या बक्षिसाची मागणी संबंधित लॉट काढल्यावर कोणत्याहि वेळीं करावी. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें क्लेम ( मागणी ) मंजूर केल्यावर ज्या ऑफिसांत उमेदवारानें बाँड सादर केला असेल त्या ठिकाणीं बक्षिसाची रक्कम दिली जाईल.

### विजयी नंबर्सची प्रसिद्धि

संबंधित लॉट काढल्यावर बक्षिसें मिळालेल्या बाँडसचा तपशील इंडिया गॅझेटमध्यें व वर्तमानपत्रांत शक्य तितक्या लवकर जाहीर करण्यांत येईल. दिनांक १ एप्रिल १९६५ रोजीं व नंतर प्राइज बाँडस् सादर केल्यावर मूळ रकमेस ( at par ) परतफेड करण्यांत येईल.

---

**मुधोळ येथें साखरेचा कारखाना**—विजापूर जिल्ह्यांत मुधोळ येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक साखरेचा कारखाना लवकरच काढण्यास येणार आहे. ह्या भागांतील शेतकरी कारखाना काढण्यास फार उत्सुक असून भाग-भांडवलाची उभारणी महिन्याच्या आंत होईल असें म्हणतात.

**साखर-कारखान्यांना उसाचा पुरवठा**—उत्तर प्रदेश व पंजाब सरकारनें साखरेच्या कारखान्यांना उसाचा पुरवठा भरपूर प्रमाणांत व्हावा म्हणून कांहीं खास उपाय योजण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें खंडसारी साखरेच्या कारखान्यांनीं मोठ्या कारखान्यापासून दूर अशा ठिकाणीं उत्पादन करावें म्हणून त्यांनाहि उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे.

**लोखंडी नळ करण्याचा कारखाना**—मोठे लोखंडी नळ तयार करण्याचा कारखाना रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याच्या जवळ येत्या सप्टेंबरपासून सुरू करण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी ३ कोटी रुपये खर्च येईल. नळ तयार करण्यासाठी लागणारें पोलाद रूरकेला कारखान्यांतूनच घेण्यांत येईल.

## भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ

| वर्ष | राष्ट्रीय उत्पन्न (कोटी रु.) | | दर माणशीं उत्पन्न (रु.) | | राष्ट्रीय उत्पन्नाचा इंडेक्स नं. (१९४८–४९=१००) | | दर माणशीं उत्पन्नाचा इंडेक्स नं. (१९४८–४९=१००) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | चालू किंमतीनें | १९४८–४९ च्या किंमतीनें | चालू किंमतीनें | १९४८–४९ च्या किंमतीनें | चालू किंमतीनें | १९४८–४९ च्या किंमतीनें | चालू किंमतीनें | १९४८–४९ च्या किंमतीनें |
| १९४८–४९ | ८,६५० | ८,६५० | २४६·९ | २४६·९ | १००·० | १००·० | १००·० | १००·० |
| १९४९–५० | ९,०१० | ८,८२० | २५३·९ | २४८·६ | १०४·२ | १०२·० | १०२·८ | १००·७ |
| १९५०–५१ | ९,५३० | ८,८५० | २६५·२ | २४६·३ | ११०·२ | १०२·३ | १०७·४ | ९९·८ |
| १९५१–५२ | ९,९७० | ९,१०० | २७४·० | २५०·१ | ११५·३ | १०५·२ | १११·० | १०१·३ |
| १९५२–५३ | ९,८२० | ९,४६० | २६६·४ | २५६·६ | ११३·५ | १०९·४ | १०७·९ | १०३·९ |
| १९५३–५४ | १०,४८० | १०,०३० | २८०·७ | २६८·७ | १२१·२ | ११६·० | ११३·७ | १०८·८ |
| १९५४–५५ | ९,६१० | १०,२८० | २५४·२ | २७१·९ | १११·१ | ११८·८ | १०३·० | ११०·१ |
| १९५५–५६ | ९,९८० | १०,४८० | २६०·६ | २७३·६ | ११५·४ | १२१·२ | १०५·५ | ११०·८ |
| १९५६–५७ | ११,३१० | ११,००० | २९१·५ | २८३·५ | १३०·८ | १२७·२ | ११८·१ | ११४·८ |
| १९५७–५८ | ११,३६० | १०,८३० | २८९·१ | २७५·६ | १३१·३ | १२५·२ | ११७·१ | १११·६ |
| १९५८–५९ | | ११,५७० | | २९०·७ | | १३३·८ | | ११७·७ |

## जनतेजवळील पैशाचा पुरवठा

(आकडे कोटी रुपयांचे)

| | १९५९ अखेर | १९५८ अखेर | १९५७ अखेर | १९५६ अखेर |
|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ |
| १. पैशाचा पुरवठा | | | | |
| (१) जनतेजवळील चलन ... | १७५३·२२ | १६०६·४५ | १५२६·१७ | १४८५·३४ |
| (२) बँकांकडील डिमांड ठेवी ... | ७५१·९७ | ७२६·०३ | ७३२·२४ | ६८१·३५ |
| (३) रिझर्व्ह बँकेकडील इतर ठेवी ... | १४·७७ | १७·३८ | १६·५१ | ११·९६ |
| (४) जनतेजवळील पैसा (१+२+३) ... | २५१९·९६ | २३४९·८५ | २२७४·९२ | २१७८·६५ |

## उद्योगविनिमय केंद्रांचें काम

| | केंद्रांची संख्या | नवीन नोंदी | रिकाम्या जागा | दिलेल्या नोकऱ्या | शिल्लक नांवें |
|---|---|---|---|---|---|
| १९५५ | १३६ | १,५८४,०२४ | २८०,५२३ | १८९,७३५ | ६९१,९५८ |
| १९५६ | १४३ | १,६६९,८९५ | २८७,६१८ | १८६,८५५ | ७५८,५०३ |
| १९५७ | १८१ | १,७७४,६६८ | २९७,१८८ | १९२,८३१ | ९२२,०९९ |
| १९५८ | २१२ | २,२०३,८९१ | ३६४,८८४ | २३३,३२० | १,१८३,२९९ |
| १९५९ | २४४ | २,४७१,५९६ | ४२४,३९३ | २७१,१३१ | १,४२०,९०१ |

**महाग पडलेली देणगी**—रशिआनें रंगून शहराजवळ एक विलासी हॉटेल बांधून तें ब्रह्मदेशाला देणगी म्हणून देण्याचें ठरविलें आहे. हॉटेलची इमारत आतां पूर्ण होत आली आहे. पण हें हॉटेल चालविण्यास घेण्याचें तीन परदेशी कंपन्यांनीं नाकारलें आहे. इमारत ५ मजली असून तींत २०८ खोल्या आहेत.

**गंडक नदी योजना**—गंडक नदी योजनेच्या कामाला पुढील महिन्यापासून प्रारंभ करण्यांत येणार आहे. ही योजना विविध उद्देशांची असून ती पुरी झाल्यावर नेपाळ, उत्तरप्रदेश व बिहार ह्या तीन राज्यांतील मोठ्या जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागेल. शिवाय नदीच्या पुरामुळें होणाऱ्या नुकसानीलाहि पायबंद बसेल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.